दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 28 जुलै 2026 | अंक क्र. 82 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# मी एसीतला नाही, तर रस्त्यावर उतरणारा कार्यकर्ता!

## काँग्रेसच्या टोमण्यावर धर्मेंद्र प्रधान यांचा पलटवार; राजीनाम्यानंतर संसदेत जंगी स्वागत

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट (NEET) पेपर फुटी प्रकरणाच्या वादात शिक्षणमंत्रिपदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्यानंतर धर्मेंद्र प्रधान सोमवारी पहिल्यांदाच संसद भवनात पोहोचले. या वेळी सत्ताधारी भाजप आणि एनडीएच्या (NDA) खासदारांनी त्यांचे दणक्यात स्वागत केले. संसद भवनाच्या आवारात धर्मेंद्र प्रधान यांच्या गाडीतून उतरताच "धर्मेंद्र प्रधान झिंदाबाद" अशा जोरदार घोषणाबाजीने परिसर दुमदुमून गेला. गाडीतून उतरून प्रधान यांनी हसतमुखाने, हात जोडून सर्वांचे अभिवादन स्वीकारले. खासदार आणि समर्थकांच्या अलोट गर्दीत एका खासदाराने त्यांच्या डोक्यावर पारंपारिक टोपी आणि खांद्यावर शाल पांघरून त्यांचा सन्मान केला. या प्रसंगी बोलताना एका सत्ताधारी खासदाराने म्हटले की, "कोणताही थेट आरोप झालेला नसताना किंवा गैरव्यवहारात नाव नसताना स्वतःहून नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामा देणारे प्रधान हे देशातील पहिलेच मंत्री असावेत." विरोधी पक्षांच्या वाढत्या दबावानंतर त्यांनी शनिवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.**

### 'एसी रुम'मधील नेता नाही; काँग्रेसच्या वक्तव्यावर सडेतोड उत्तर

■ संसद भवनात प्रवेश करताना काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी धर्मेंद्र प्रधान यांना पाहताच "असं घडत असतं!" असा उपरोधिक टोला लगावला. यावर जराही न डगमगता धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ पलटवार केला. "काहीही घडलेलं नाही! मी केवळ एसी रुममध्ये बसून राजकारण करणारा नेता नाही, तर रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा कार्यकर्ता आहे," अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसवर जोरदार प्रतिहल्ला चढवला.

### राजीनाम्यामागे 'त्याग' आणि 'जबाबदारीचा' संदेश

■ राजीनाम्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर (ट्विटर) आपली भूमिका स्पष्ट केली. "गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांमुळे मी अत्यंत व्यथित झालो आहे. हा माझ्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा किंवा अहंकाराचा विषय नाही. देशातील युवाशक्ती हीच भारताची खरी ताकद आहे. या तरुणांना कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाच्या किंवा अविश्वासाच्या दुष्टचक्रात अडकू देणार नाही, हाच माझा निर्धार आहे," असे प्रधान यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले.

### पुढे काय? संघटन की राज्याची धुरा?

■ शिक्षणमंत्रिपदावरून पायउतार झाल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांच्यावर आता पक्षाकडून कोणती नवी जबाबदारी दिली जाणार, याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. आगामी काळात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर भाजपच्या निवडणूक प्रचाराची मोठी धुरा सोपवली जाऊ शकते किंवा पक्ष संघटनेत महत्त्वाचे पद दिले जाऊ शकते. समर्थकांच्या मते, राष्ट्रीय हितासाठी त्यांनी दिलेला हा त्याग त्यांची राजकीय प्रतिमा उंचावणारा ठरेल.



### भाजपचे संकटमोचक आणि संघटक

धर्मेंद्र प्रधान यांची भाजपमधील गणना केवळ ओडिशातील बड्या नेत्यांमध्येच नाही, तर राष्ट्रीय स्तरावरील एका कुशल रणनीतिकार आणि संकटमोचक म्हणून केली जाते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयात त्यांचा सिंहाचा वाटा होता. याशिवाय उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, बिहार आणि कर्नाटकातील निवडणुकांमध्ये त्यांनी प्रभारी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' शासन आणि जनतेतील दुवा: आमदार सुरेश धस

### आष्टी येथे 'समाधान शिबिर टप्पा क्र- 1' ची प्रभावी अंमलबजावणी, 10 हजार प्रमाणपत्रे, 15 हजार सनदांचे वितरण

■ आष्टी प्रतिनिधी :

महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' माध्यमातून महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख झाले असून नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामांना मोठी गती मिळाली आहे. पाणंद रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागत असून विविध ऑनलाइन प्रमाणपत्रे सुलभपणे उपलब्ध होत आहेत. घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुलभ झाली असून, शासनाच्या योजना थेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे हे प्रभावी माध्यम ठरले आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजविण्याची गरज कमी झाली आहे, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात तसेच शासकीय कामांना गती मिळावी, या उद्देशाने सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी आष्टी येथील मंगल कार्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या विशेष शिबिराच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक, उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, दत्तात्रय निलावाड, सुरेश घोळवे, गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ, संतोष माने, भरत नागरे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, ओमप्रकाश शेळके, अमृत गांगर्डे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

आ. धस पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महसूल अभियानामुळे जमिनीच्या मोजणीसह अनेक प्रकरणांचा जलद निपटारा होत असून प्रलंबित कामांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. शासनाने पारदर्शक व जबाबदार प्रशासनावर भर दिला आहे. याच वेळी शिरूर तालुक्यातील तहसील कार्यालयातील टाचण गायब झाल्याची घटना गंभीर असून, त्याची चौकशी करून दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमप्रसंगी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे ७/१२ संबंधित प्रश्न गावपातळीवरच सोडविण्याची गरज व्यक्त केली. आपल्या कार्यकाळात जिल्ह्याला हजारो कोटी रुपयांचा पीकविमा मंजूर झाल्याचे सांगत, सध्या शेतकऱ्यांना पीकविमा मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी पुढाकार घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला. माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी समाधान शिबिर ही अत्यंत चांगली संकल्पना असल्याचे सांगत, प्राप्त तक्रारींपैकी किती तक्रारींचे प्रत्यक्ष निराकरण झाले याची आकडेवारी उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली. तसेच प्रत्येक तलाठी व ग्रामसेवक यांनी नियमितपणे सजावर उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांनी शिबिराच्या स्वरूपाविषयी माहिती देताना सांगितले की, या शिबिरामध्ये महसूल विभागासह सर्व विभागांचे अधिकारी एकाच छताखाली नागरिकांना सेवा देत आहेत. या उपक्रमातून सुमारे १० हजार लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रे तर १५ हजार सनदांचे वितरण करण्यात येत आहे.

ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनी कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत, या शिबिरातून शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अद्ययावत करून त्यांचे प्रश्न मार्गी लावावेत, अशी मागणी केली. तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी कृषी विभागाच्या सर्व योजना महाडीबीटी पोर्टलद्वारे पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने राबविल्या जात असल्याचे सांगून, आष्टी व पाटोदा तालुक्यातील २,३०० अर्जांपैकी १,५०० शेतकऱ्यांना सुमारे ₹३ कोटींचा लाभ देण्यात आल्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले. त्यांनी सांगितले की, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात अशा समाधान शिबिरांचे आयोजन करून नागरिकांच्या महसुली अडचणी तातडीने सोडविल्या जात आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले, तर आभार तहसीलदार वैशाली पाटील यांनी मानले. या शिबिरास नागरिक, शेतकरी, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नादुरुस्त रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करुन एस.टी. बस सेवा सुरु करा : तालुकाध्यक्ष अमर देशमुख

### कोळकानडी - माकेगाव - हिवरा - वरपगाव - सोमनाथ बोरगाव - धानोरा - आपेगाव तसेच या मार्गावरील सर्व गावांच्या रस्त्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवेदन

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

कोळकानडी - माकेगाव - हिवरा - वरपगाव - सोमनाथ बोरगाव - धानोरा - आपेगाव तसेच या मार्गावरील सर्व गावांचे नादुरूस्त रस्ते तातडीने दुरूस्त करून एस.टी. बस सेवा सुरू करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी सोमवारी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी सोमवार, दिनांक २७ जुलै रोजी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कोळकानडी, माकेगाव, हिवरा, वरपगाव, सोमनाथ बोरगाव, धानोरा, आपेगाव तसेच या मार्गावरील इतर सर्व गावांतील नागरिकांना दळणवळणाच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरील रस्ते अनेक ठिकाणी अत्यंत खराब, खड्डेमय व वाहतुकीस अयोग्य झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, रूग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांची दुरवस्था असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाची (एस.टी.) बस सेवा या मार्गावर नियमितपणे उपलब्ध नाही. परिणामी नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून त्यासाठी ज्यादा आर्थिक खर्च सहन करावा लागत आहे.



तसेच आपत्कालीन परिस्थितीत रूग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळण्यातही अडचणी निर्माण होत आहेत. तरी आपण या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन पुढील प्रमाणे कार्यवाही करावी : कोळकानडी - माकेगाव - हिवरा - वरपगाव - सोमनाथ बोरगाव - धानोरा - आपेगाव या संपूर्ण मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती व मजबुतीकरण करण्यात यावे, या मार्गावरील सर्व गावांना जोडणारी राज्य परिवहन महामंडळाची (एस.टी.) बस सेवा तात्काळ सुरू करण्यात यावी. विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी नियमित बस फेऱ्यांचे नियोजन करण्यात यावे. संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन या कामास प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी. आपण जनहिताचा विचार करून वरील मागण्यांवर तातडीने सकारात्मक कार्यवाही कराल, अशी आम्हां सर्व नागरिकांची अपेक्षा आहे. या सर्व मागण्या मान्य नाही केल्या तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदन बजरंग बप्पा सोनवणे (खासदार, बीड), सौ.नामिताताई मुंदडा (आमदार, केज विधानसभा), आगारप्रमुख, महाराष्ट्र परिवहन मंडळ, अंबाजोगाई आणि मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आले आहे.

## कारगिलच्या रणांगणातील थरारक अनुभवांनी विद्यार्थी भारावले ; मोदी लर्निंग सेंटरमध्ये शहीदांना भावपूर्ण अभिवादन

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल (मोदी लर्निंग सेंटर), अंबाजोगाई येथे कारगिल विजय दिन देशभक्ती, शौर्य आणि राष्ट्रप्रेमाच्या वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धातील शहीद वीर जवानांना अभिवादन करताना विद्यार्थ्यांना देशभक्तीची प्रेरणा देणारा हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. कारगिल युद्धाचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या भारतीय लष्करातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत रणांगणातील अनुभव कथन केल्याने संपूर्ण सभागृह भारावून गेले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भारतीय लष्करातील अधिकारी तथा कारगिल युद्धाचे प्रत्यक्ष साक्षीदार सतीश संभाजीराव तपसे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य डॉ.पांडुरंग पाटील होते. यावेळी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक संकेत राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालिका सौ.डिंपल मोदी, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, माजी उपप्राचार्य वसंतराव चव्हाण, मुख्याध्यापक प्रदीप सोनी, विनायक मुंजे, राघवेंद्र राजमान्य, चंद्रकांत गायकवाड, समन्वयक रविंद्र राजगुरू, जयशंकर त्रिपाठी, श्रीमती शारदा शिंदे, नितीन घोबाळे, श्रीमती शिल्पा पौळ, श्रीमती स्नेहल पाटील, सांस्कृतिक विभाग समन्वयक श्रीमती सुचिता दहिफळे तसेच परिपाठ प्रमुख केतेश्वरण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन, भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन आणि कारगिल युद्धातील शहीद वीर जवानांना

पान २ वर




## देवाभाऊंचा जनोत्सव

राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री अशा मान्यवरांचे वाढदिवस सर्वत्र नेहमीच उत्साहात साजरे केले जातात. त्यातच ते गाव त्यांची जन्मभूमी किंवा कर्मभूमी असेल, तर मग विचारायलाच नको. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर शहरातच जन्मले, इथेच शिकले आणि नागपुरातूनच त्यांनी राजकारणालाही सुरुवात केली. याच शहरातल्या पश्चिम दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्रातून ते निवडून येतात. ही त्यांची सहावी टर्म आहे. महाराष्ट्राचे गठन झाले, त्यापूर्वी नागपूर ही जुन्या मध्य प्रांताची राजधानी होती. मात्र तेव्हापासूनच नागपूरचा नागरिक असलेला कोणी मुख्यमंत्री झाला नव्हता. मात्र ऑक्टोबर २०१४ मध्ये सर्वप्रथम देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने नागपूरला मुख्यमंत्रीपद लाभले होते. तेव्हापासूनच महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणून फडणवीस ओळखले जातात. त्यांचा तसा दबदबा देखील आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांचा छप्पन्नावा वाढदिवस या आठवड्यात बुधवारी म्हणजेच २२ जुलैला होता. त्यानिमित्ताने नागपुरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एक महायज्ञ होता, सायकल आणि छत्री वाटप होते आणि इतर कार्यक्रमांचीही रेलचेल होती. मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दक्षिण पश्चिम नागपूर आणि पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्र भाजपच्या वतीने रामनगर चौकातील श्रीराम मंदिरात श्री लक्ष्मी नृसिंह महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. या महायज्ञात ५६ समाजातील दांपत्यांनी वैदिक विधीनुसार समिधा अर्पण करून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उत्तम दीर्घायुरारोग्य आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सामूहिक प्रार्थना केली. नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांच्या नेतृत्वात झालेल्या या महायज्ञाचा शुभारंभ भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाला. यज्ञ यागातील सर्व धार्मिक विधी वैदिक परंपरेनुसार पार पडले. वेदमंत्रांचा मंगल घोष, भजनांचा निनाद अशा भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. महाआरती आणि महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली होती.

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात महाराज अभियान शिबीर आयोजित केले होते. यावेळी २२० बेघरांना मालकी हक्काचे पट्टे, ४०० जणांना स्वामित्व हक्क प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच ९८ शेतमजूर महिलांना शेतकरी प्रमाणपत्राचेही वाटप करण्यात आले. बेलतरोडी येथील पाच मंदिर मैदानावर झालेल्या या शिबिराला मार्गदर्शन करताना आम्ही प्रत्येकाला आदर्श प्रशासनाचा प्रत्येक देऊ अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्य सफाई कामगार आयोग आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सफाई कामगारांना सहा कोटी रुपयांच्या रिक्षा सायकली आणि जीवन उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री तुमच्याबाबत सकारात्मक आहेत. नागपुरात सफाई कामगारांना लवकरच घरकुले दिली जातील याची खात्री देखील बावनकुळे यांनी यावेळी दिली. यावेळी सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष सतीश डागोर,आमदार मोहन मते, आमदार परिणय फुके, महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी प्रभृती उपस्थित होते. याच निमित्ताने भाजप व्यापारी आघाडीतर्फे प्रतापनगर चौकातील ठिय्यावर बसणाऱ्या बांधकाम कामगारांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. याच निमित्ताने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने १५६ भजनी मंडळांकडून विठ्ठल भक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी भजनी मंडळ स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार अनिल सोले यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त गांधीनगर येथे माजी महापौर वसुंधरा मसूरकर यांच्या नेतृत्वात हनुमान मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. यात परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त नागपुरात दिवसभर ठीकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले आणि सर्वांनीच नागपूरकरांचे लाडके देवाभाऊ फडणवीस यांच्या दीर्घायुरारोग्यासाठी परमेश्वर चरणी प्रार्थना केली.







# कारगिलच्या रणांगणातील थरारक अनुभवांनी विद्यार्थी भारावले ; मोदी लर्निंग सेंटरमध्ये शहीदांना भावपूर्ण अभिवादन

**पान १ वरुन**

पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर इयत्ता आठवी 'ड'च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर शालेय परिपाठ सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख अतिथी सतीश तपसे यांनी कारगिल युद्धातील संघर्ष, प्रतिकूल परिस्थितीत भारतीय सैनिकांनी दाखविलेली अदम्य जिद्द, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचे जिवंत अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. सीमारेषेवर देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानांचे जीवन, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा याविषयी त्यांनी हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांनी विद्यार्थी भावूक झाले असून, देशसेवा आणि राष्ट्रप्रेमाची भावना प्रत्येकाने आपल्या जीवनात जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, प्रभावी भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण राष्ट्रप्रेमाने भारावून टाकले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.पांडुरंग पाटील यांनी कारगिल युद्धातील वीर जवानांचे बलिदान हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांचा अंगीकार करावा, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग व शिक्षकवृंद यांच्या सहकार्याने करण्यात आले. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी व सर्व सन्माननीय संचालक मंडळ यांनी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना कारगिल विजय दिनाच्या शुभेच्छा देत शहीद जवानांच्या बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमणी पांडुरंग झडके आणि श्रेया सतिश केंद्रे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार शरयु बाळु झोबंडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# 29 जुलै गुरु पौर्णिमा




प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील "पौर्णिमा"साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे. कारण "गुरू शिवाय ज्ञान नाही"ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे."आई-वडिल" हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र- आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई-वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे. ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते. आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घडली तर आपण "आईग" म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.

यामुळे आपले दु:ख कमी होते. त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण "बापरे" म्हणतो. यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो. अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे हे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई- वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही. अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच!यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते व पहाडासारखा उभा रहातो.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते. कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो.तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू- शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच.

व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला. त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते "गुरू बिना ज्ञाण अधुरा". त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.

भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे, होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते. ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते. त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.



"आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी". गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की बदलते हवामान व देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार )

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# वन्यजीव जगतील तरच मानव जीवन वाचणार (आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन विशेष - 29 जुलै 2026)

पृथ्वीवरील प्रत्येक जीव आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेद्वारे नैसर्गिक समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो. अन्नसाखळीतील प्रत्येक घटक आवश्यक आहे, कारण एखाद्या एका जीवाचेही असंतुलन संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते. आजच्या काळात मनुष्याला वगळता इतर सर्व जीव निसर्गसंवर्धनात आपली भूमिका पार पाडत आहेत. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसे अन्न हे सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक असून ते फक्त पर्यावरण निरोगी आणि संतुलित असेल तरच उपलब्ध होऊ शकते. सूक्ष्मजीव माती सुपीक बनवतात, तर पक्षी आणि वन्यप्राणी बियांचा प्रसार करून नवीन वनस्पती व जंगलांच्या वाढीस मदत करतात. जंगलातील जीव सुरक्षित राहिले तर जंगल हिरवेगार राहते, ऋतुचक्र संतुलित राहते, जलस्रोत सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. त्यामुळे प्रदूषण कमी होते, रोगांचा धोका घटतो आणि जीवनमान अधिक चांगले होते. प्रत्यक्षात वन्यजीव हे निसर्गाचे खरे रक्षक आहेत, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. मनुष्याशिवाय निसर्ग स्वतःला पुन्हा वेगाने सावरू शकतो; परंतु निसर्गाशिवाय मानवजीवनाची कल्पनाही अशक्य आहे. त्यामुळे निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक सजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात जगण्याचा अधिकार आहे. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या संघर्षात दोघांनाही जीवितहानीचा सामना करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजे-महाराजे आणि इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर शिकार केल्यामुळे अनेक वन्यप्राण्यांची संख्या अत्यंत कमी झाली. अनेक प्रजाती कायमस्वरूपी नामशेष झाल्या. वन्यजीवांची झपाट्याने घटणारी संख्या रोखण्यासाठी सरकारने विविध कायदे केले आहेत. आयआयटी बॉम्बे आणि सस्त्रा विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनानुसार, २०१५ ते २०१९ या कालावधीत देशात प्रत्येक १ चौ.कि.मी. जंगलवाढीच्या बदल्यात सुमारे १८ चौ.कि.मी. जंगल नष्ट झाले. नैसर्गिक, दाट आणि जुनी जंगले झपाट्याने नाहीशी होत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर त्या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे अस्तित्व गंभीर संकटात येईल.

देशात वाढत्या शहरीकरणामुळे पारंपरिक शेती कमी होत आहे. शहराजवळच्या खेडोपाडी काँक्रीटची जंगले उभी राहत असून नैसर्गिक जंगले आकुंचन पावत आहेत आणि मानवी हालचाली सातत्याने वाढत आहेत. जंगलाजवळ निसर्गाच्या सानिध्यात फार्महाऊस उभारण्याचा कल वाढला आहे. विकासाच्या नावाखाली जंगलातून महामार्ग बांधले जात आहेत तसेच जंगलतोड करून उत्खनन सुरू आहे. यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास थेट नष्ट होत आहेत आणि वर्षानुवर्षे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे.

ज्या जंगलांमध्ये वाघ राहतात, तेथील परिसंस्था अधिक समृद्ध आणि संतुलित असते. वाघ हा केवळ एक वन्यप्राणी नसून संपूर्ण जंगलाचा संरक्षक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी विशाल, सुरक्षित आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त अधिवास आवश्यक असतो. अशा अधिवासांचे संरक्षण केल्याने असंख्य वन्यप्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपूर्ण जैवविविधता सुरक्षित राहते. वाघ शाकाहारी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वनस्पतींचा अतिवापर टळतो आणि नैसर्गिक समतोल अबाधित राहतो. सुरक्षित जंगले अधिक प्रमाणात कार्बन शोषून घेतात आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत करतात. तसेच दाट जंगले पावसाच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करून पुराची तीव्रता कमी करतात आणि कोट्यवधी लोकांना गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. त्यामुळे वाघ आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संरक्षण होय. हे संरक्षण मानवजीवन, शेती, जलस्रोत आणि भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

दरवर्षी २९ जुलै रोजी "आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन" साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश संकटग्रस्त मोठ्या मांजरांच्या प्रजाती आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा आहे. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. "वाघ वाचवा, जंगल वाचवा, निसर्ग वाचवा" हा संदेश याच कारणासाठी दिला जातो, कारण वाघ टिकले तरच आपणही सुरक्षित राहू. ही बाब प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्लोबल टायगर फोरमच्या माहितीनुसार, जगभरातील जंगलांमध्ये केवळ ५,६६० वाघ शिल्लक आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या "भारतातील वाघांची स्थिती: सह-भक्षक आणि भक्ष्य - २०२२" या अहवालानुसार त्यापैकी ३,६८२ वाघ भारतात आढळतात. दरवर्षी रस्ते अपघात, शेतांमधील विजेचा धक्का, उघड्या विहिरीत पडणे आणि अवैध शिकारीमुळे असंख्य वन्यजीवांचा



अकाली व दुर्दैवी मृत्यू होतो. विदर्भ (महाराष्ट्र) येथील वृत्तपत्रांमध्ये विशेषतः वाघांच्या मृत्यूच्या घटना वारंवार प्रसिद्ध होत असतात. सातत्याने वाढणारे वाघांचे मृत्यू हे गंभीर चिंतेचे कारण आहे. गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्रात २४ वाघांचा मृत्यू झाला आहे. तसेच २०२५ मध्ये मध्यप्रदेशात ५४ वाघांचा, तर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात ४१ वाघांचा मृत्यू झाला.

वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर यांच्या माहितीनुसार प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्ट्यांचा नमुना वेगळा असतो, जसा प्रत्येक माणसाच्या बोटांच्या ठशांचा नमुना वेगळा असतो. मादी वाघीण आपल्या पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या खुणांचा संकेत म्हणून वापर करते. जगातील निम्म्याहून अधिक वाघ भारतात आढळतात, ही आपल्या देशाच्या समृद्ध जैवविविधतेची मोठी साक्ष आहे. वाघ गुरगुरणे, डरकाळी फोडणे, कण्हणे, फुत्कार काढणे आणि धापा टाकण्यासारख्या विविध आवाजांद्वारे संवाद साधतात. शास्त्रज्ञांच्या मते वाघ सुमारे २० लाख वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहेत.

मात्र, गेल्या शंभर वर्षांत मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि अवैध शिकारीमुळे त्यांच्या संख्येत सुमारे ९७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे त्यांना संकटग्रस्त प्रजाती मानले जाते. आजही अवैध शिकार हा त्यांच्या अस्तित्वासमोरील सर्वात मोठा धोका आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आशियामध्ये त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. २०१६ मध्ये काही भागांत वाघांची संख्या वाढल्याची नोंद झाली असली, तरी दक्षिण-पूर्व आशियात त्यांची संख्या अजूनही घटत आहे.

मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याकडे आज कायदेशीर अधिकार, प्रगत तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, सोशल मीडिया, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाज असे अनेक आधार उपलब्ध आहेत. तरीसुद्धा उच्चशिक्षित आणि जागरूक असूनही अनेक प्रसंगी माणूस स्वतःला असहाय्य आणि फसवला गेल्यासारखे अनुभवतो. स्वतःच्या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारी कार्यालये, लोकप्रतिनिधी आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवूनही अनेकदा त्याला समाधानकारक न्याय मिळत नाही. पावसाळ्यात पूर, उन्हाळ्यात दुष्काळ, उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई, हिवाळ्यात धुके, हायपोथर्मिया तसेच विविध नैसर्गिक आपत्ती अशा संकटांना मानवालाही सामोरे जावे लागते. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही जर माणूस अशा परिस्थितीत हतबल होत असेल, तर त्याच्या तुलनेत वन्यप्राण्यांची अवस्था किती कठीण असेल, याची कल्पनाही करणे अवघड आहे. क्षणभर मुक्या वन्यजीवांच्या दृष्टीकोनातून विचार करून पाहूया. त्यांना माणसाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यांना केवळ निसर्गाकडून अन्न आणि पाण्याची गरज असते. मानवी हस्तक्षेप नसल्यास निसर्ग सर्व सजीवांचे पालनपोषण करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. मग आपणच वन्यजीवांना त्रास देत आहोत का? की वन्यजीव आपल्याला त्रास देत आहेत? वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांचा वेळेवर, संवेदनशीलतेने आणि सखोलपणे विचार करणे आज अत्यंत आवश्यक आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जंगलांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण, अवैध शिकारीला आळा, पर्यावरणपूरक विकास आणि निसर्गाविषयी संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय मानव आणि वन्यजीव यांच्यातील समतोल कायम राहू शकणार नाही. वन्यजीव टिकले तरच जंगले टिकतील, जंगले टिकली तरच पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच - "वन्यजीव वाचवा, निसर्ग वाचवा आणि मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित ठेवा."

■ लेखक - डॉ. प्रीतम भी. गेडाम





# सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 च्या जन माहिती अधिकाऱ्याला पाच हजार रुपयांचा दंड

## राज्य माहिती आयोगाचा कैलास दरेकर यांच्या अर्जावर मोठा निर्णय

■ आष्टी प्रतिनिधी

माहिती अधिकार (RTI) कायद्यांतर्गत मागवलेली माहिती मुदतीत न देणाऱ्या आणि आयोगाच्या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. ०२ च्या तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याला राज्य माहिती आयोगाने मोठा दणका दिला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) नुसार संबंधित अधिकाऱ्याला ५,०००/- रुपये (अक्षरी पाच हजार रुपये) इतकी शास्ती (दंड) ठोठावण्यात आली आहे. राज्य माहिती आयुक्त (छत्रपती संभाजीनगर खंडपीठ) प्रकाश इंदलकर यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.काय आहे सविस्तर प्रकरण?आष्टी (जि. बीड) येथील रहिवासी श्री. कैलास दरेकर यांनी १२ मार्च २०२१ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. ०२, बीड यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत अर्ज केला होता. मात्र, संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करून दिली नाही. कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्याने कैलास दरेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील (क्र. ८५८२/२०२१) दाखल केले होते.आयोगाच्या आदेशांना केराची टोपली:या प्रकरणी आयोगाने १३ ऑक्टोबर २०२३ रोजी आदेश देऊन संबंधित जन माहिती अधिकाऱ्याला 'मुदतीत माहिती का दिली नाही आणि तुमच्यावर दंडात्मक कारवाई का करू नये?' याबाबत ३० दिवसांत खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, संबंधित अधिकाऱ्याने आयोगाकडे कोणताही खुलासा सादर केला नाही. अधिकाऱ्याची ही भूमिका आयोगाच्या आणि माहिती अधिकार कायद्याच्या दृष्टीने नकारात्मक आणि जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणारी असल्याचे आयोगाने आपल्या आदेशात नमूद केले आहे. शास्तीची रक्कम पगारातून वसूल होणार:तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर, आयोगाने त्यांना ५,००० रुपयांचा अंतिम दंड ठोठावला आहे. या प्रकरणी सध्याच्या वर्तमान जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित जबाबदार अधिकाऱ्याचे नाव निश्चित करून, ही दंडाची रक्कम त्यांच्या पगारातून वसूल करावी आणि ती शासकीय लेखाशीर्षकात जमा करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अपिलातील निर्णयानुसार अर्जदाराला तातडीने माहिती उपलब्ध करून देण्याचे निर्देशही कायम ठेवण्यात आले आहेत.या कारवाईमुळे माहिती अधिकार कायद्याचा अवमान करणाऱ्या आणि नागरिकांना माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.





दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, 28 जुलै 2026
Last page

# श्री क्षेत्र कपिलधार येथे 35 दिवशीय अखंड शिवनाम सप्ताह व चातुर्मास महोत्सवाचे आयोजन

## गुरुपौर्णिमेपासून होणार सोहळ्याचा प्रारंभ; भाविकांनी उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

वीरशैव लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपिलधार येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही ३५ दिवशीय अखंड शिवनाम सप्ताह, ज्ञानयज्ञ महोत्सव व परमरस्य पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा चातुर्मास सोहळा बुधवार (दि. २९ - गुरुपौर्णिमा) पासून सुरु होऊन बुधवार (दि. २ सप्टेंबर) पर्यंत चालणार आहे.

स्वर्गीय डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज (अहमदपूरकर) यांच्या प्रेरणेने आणि श्री सिद्धलिंग शिवाचार्य महाराज (साखरखेर्डा) यांच्या मार्गदर्शनाखाली, गाढे पिंपळगाव येथील दिवंगत सोनाप्पा फुटके व अन्नपूर्णाबाई फुटके या दाम्पत्याने कपिलधार देवस्थान पंच कमिटीच्या सहकार्याने ५३ वर्षांपूर्वी या सप्ताहाची पायाभरणी केली होती. ही अखंड परंपरा यंदाही तितक्याच भक्तीमय वातावरणात साजरी होत आहे. या सप्ताहात महाराष्ट्रातील सर्व शिवाचार्यांची उपस्थिती असणार आहे.

**विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

बुधवार, दि. २९ रोजी गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर श्री विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते कलशपूजन करून या ३५ दिवशीय सप्ताहाचा प्रारंभ होईल. महोत्सवादरम्यान दररोज पहाटे शिवपाठ, मन्मथस्वामी यांची महापूजा, रुद्रपठण, गाथा भजन, प्रवचन, सायंकाळी कीर्तन आणि रात्री शिवजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. ३५ दिवसांच्या या कालावधीत महाराष्ट्रातील विविध मान्यवर महाराजांची कीर्तने रंगणार आहेत.

**महाप्रसाद व दीपोत्सव**

सप्ताहाच्या कालावधीत दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सोहळ्याच्या अंतिम दिवशी भव्य दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. या भक्तिमय चातुर्मास सोहळ्यास महाराष्ट्रातील वीरशैव समाजबांधवांसह सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कपिलधार देवस्थान पंच कमिटी व सप्ताह मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा ज्ञानबोधिनी विद्यालयात गौरव



**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालय, परळी वैजनाथच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा शाळेत विशेष गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

यामध्ये चि. अजिंक्य अश्विन मोगरकर, चि. विनायक सचिन भुतडा, कु. ओवी सचिन फुटाणे आणि चि. रमण विजय तोष्णीवाल यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे सचिव तथा ज्ञानबोधिनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, रजिस्टर व कंपास पेटी देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी परीक्षा विभाग प्रमुख गोपनपाळे सर, जाधव सर तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक-शिक्षिकांचे आणि विद्यार्थ्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचेही कौतुक करण्यात आले. भविष्यात अधिक परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उच्च यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या असून, इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळणार आहे.

# आरतीमुळे समाजात भक्ती आणि एकतेची भावना वाढते
## ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांचे विचार

**लातूर प्रतिनिधी**

चंद्रभागेच्या आरतीमुळे केवळ धार्मिक विधीच होत नाही, तर समाजात भक्ती, श्रद्धा आणि एकतेची भावना वाढते. डॉ. विश्वनाथ कराड यांनी सुरू केलेली ही आरतीची प्रथा वारकऱ्यांचे मन परिवर्तन करते. सामूहिक आरतीमुळे हजारो भाविक, वारकरीमोठ्या संख्येने उपस्थित राहतात." असे विचार ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने पवित्र चंद्रभागेची आरती या नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून आषाढ शुद्ध एकादशीच्या पूर्व संध्येला पंढरपूर येथील भक्त पुंडलिक घाटावरह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या हस्ते चंद्रभागेची आरती संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सौ. उषा विश्वानाथ कराड, गोदावरीताई मुंडे, प्रा. स्वाती कराड चाटे , संजीवनी कराड आणि प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

ह.भ.प. डॉ. सुदाम महाराज पानेगावकर म्हणाले, "या आरती मुळे भक्तांमध्ये सेवा भाव अधिक निर्माण होतो. प्रत्येकांची सेवा करने ही आम्हाला संतांनी दिलेली शिकवण आहे. त्यामुळे त्यांच्या पाऊलांवर चालणे हे सर्व वारकऱ्यांचे कर्तव्य आहे. आज संपूर्ण जगात संत ज्ञानेश्वर व तुकाराम महाराज यांचा संदेश पोहचले आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा विनम्रता शिकविते. "चंद्रभागा आरती ही पंढरीची ओळख आहे. या परंपरेच्या माध्यमातून घराघरात भक्ती वाढते आणि माऊलींचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतो."



# शासकीय वेळेत क्रिकेटपटू केदार जाधवसोबत फोटोसेशन करणाऱ्या परळीच्या स्थापत्य अभियंत्यावर कडक कारवाईची मागणी!

## परळी वैजनाथ येथील नगर परिषदेत बायोमेट्रिक बंद, हालचाल रजिस्टर गायब

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

सोमवार, दिनांक २७ जुलै २०२६ रोजी शासकीय कामाच्या वेळेत आपले कर्तव्य बजावण्याऐवजी भारताचे माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांच्यासोबत फोटो सेशनमध्ये मग्न राहिल्याचा गंभीर आरोप परळी वैजनाथ नगर परिषदेचे स्थापत्य अभियंता श्री. ज्ञानेश्वर उत्तरेश्वर ढवळे यांच्यावर करण्यात आला आहे. या वर्तणुकीमुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अंतर्गत कडक शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात यावी, अशी जाहीर मागणी येथील एक सामान्य भारतीय नागरिक म्हणून अनिरुद्ध जोशी यांनी फोटो पुराव्यासोबत एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिरुद्ध जोशी यांनी या संदर्भात परळी वैजनाथ नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षा यांना उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्या मार्फत निवेदन सादर केले आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यावर असताना पूर्ण वेळ जनहिताच्या कामांसाठी देणे बंधनकारक असते. मात्र, जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शासकीय वेळेचा गैरवापर करत फोटो सेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचे जोशी यांनी निवेदनात म्हटले आहे.

**बांधकाम विभाग नेहमीच 'गायब'; 'हालचाल रजिस्टर'ची मागणी**

नगर पालिकेचा बांधकाम विभाग आणि त्यातील यंत्रणा बहुतांश वेळी पालिकेतून गायब असते, असा नागरिकांचा पूर्वानुभव आहे. या विभागात दुपारनंतर चौकशी केली असता, "साहेब अमुक तमुक भागात गेलेत" किंवा "कर्मचारी प्रभागात गेलेत" असे ठराविक साच्यातले उत्तर देऊन वेळ मारून नेली जाते. पालिकेचा कारभार सुनियोजित आणि पारदर्शक पद्धतीने चालण्यासाठी कर्मचाऱ्यांना 'हालचाल रजिस्टर' (मूव्हमेंट रजिस्टर) ठेवणे बंधनकारक असते. पालिका कर्मचाऱ्यांनी आपला विभाग सोडताना कोणत्या कामासाठी आणि कोठे जात आहोत, याची नोंद या रजिस्टरमध्ये करणे आवश्यक आहे. राज्यात सर्वत्र कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक प्रणाली बंधनकारक असली, तरी परळी पालिकेतील ही यंत्रणा कित्येक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे अशीही माहिती संतोष रोडे यांनी दिली.



**अभियंता ढवळे कुठे? पालिकेकडे नोंदच नाही!**

या संपूर्ण प्रकरणाबाबत पालिकेचे उप मुख्याधिकारी संतोष रोडे यांच्याशी चर्चा केली असता, पालिकेत असे कोणतेही हालचाल रजिस्टर उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, आज अभियंता ज्ञानेश्वर ढवळे यांची कोणतीही अधिकृत रजा मंजूर नसतानाही ते कुठे आहेत, याची सरकार दरबारी किंवा पालिकेकडे कोणतीही नोंद उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय वेळेत गायब राहून सेलिब्रिटीसोबत फोटो काढणाऱ्या या अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारावर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**वरिष्ठ पातळीवर तक्रारीच्या प्रतिलिपी रवाना**

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, तक्रारदार अनिरुद्ध जोशी यांनी थेट राज्याच्या सर्वोच्च प्रशासकीय पातळीवर या प्रकाराची दाद मागितली आहे. या तक्रारीच्या प्रतिलिपी पुराव्यासह मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. मा. नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य. मा. सचिव, नगर विकास खाते. मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर मा. जिल्हाधिकारी, बीड आदी मान्यवरांना पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

**कायद्यानुसार कारवाईची मागणी**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीवर नियंत्रण ठेवणाऱ्या 'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९' मधील तरतुदींचा उघडपणे भंग केल्याप्रकरणी अभियंता ढवळे यांच्यावर तात्काळ कडक कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. बायोमेट्रिक यंत्रणा बंद ठेवून आणि कोणत्याही नोंदीशिवाय गायब राहणाऱ्या अशा अधिकाऱ्यांवर नगर परिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी काय पावले उचलतात, याकडे परळीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.